

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Kavayitri Bahinabai Chaudhari**
**North Maharashtra University, Jalgaon**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६,**
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : ०२५७-२२५७२७६ to २२५७२७७, Fax Nos.:०२५७-२२५८४०३, ४०६
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/ ४८२ /२०२६ **Email** दि. ०८/०५/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि समाजकार्य महाविद्यालय
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय- उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) Academic Level 10 to 11 and Academic Level 11 to 12 मध्ये जाण्यासाठी आयोजक महाविद्यालयाकडे दि. १५ जून, २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करण्याबाबत

महादेय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि समाजकार्य महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छाननी तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर आयोजित करण्यासंदर्भात आयोजक महाविद्यालय म्हणून सहमती मागविण्यात आली होती. इच्छुक महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावातून कॅस शिबिर आयोजक महाविद्यालय म्हणून खालील महाविद्यालयाची आयोजक महाविद्यालय म्हणून प्राप्त आदेशान्वये निवड करण्यात आली आहे: -

| क्र. | महाविद्यालय | जिल्हा |
|---|---|---|
| ०१ | ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ संचलित<br>भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओ. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ | जळगाव, धुळे आणि नंदूरबार |

पात्र शिक्षकांनी उपरोक्त नमूद महाविद्यालयांमध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. प्राचार्यामार्फत प्रस्ताव दि. १५ जून, २०२६ पर्यंत सादर करावेत. महाविद्यालयांनी प्रस्तावासोबत खालील कार्यवाही करावी:-

१. सबंधित शिक्षकाने महाविद्यालयामार्फत प्रस्तावाची एक नस्ती सादर करावी व शिबिराच्या दिवशी त्याची एक आणखी नस्ती सोबत आणावी.
२. सदरचा प्रस्ताव वर नमूद केल्या प्रमाणे जिल्हानिहाय महाविद्यालयात सादर करावा. शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ नुसार सदर निर्णय लागू झाल्यापासून तीन वर्षाच्या आत जुन्या अधिसूचने (UGC चौथी दुरुस्ती सूचना) प्रस्तावाप्रमाणे सादर करण्यासाठी कळविले होते. त्याची मुदत संपलेली असल्याने सर्व शिक्षकांनी केवळ . शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ आणि शुद्धीपत्रक १० मे, २०२९ तसेच UGC अधिसूचना जुलै २०१८ नुसारच प्रस्ताव सादर करावा. त्यासाठी Undertaking प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. (विद्यापीठ संकेतस्थळावर सदरहू Undertaking उपलब्ध आहे.)

.. २

staffapp\ext.let.26\PN.17

३. प्रस्तावासोबत महाविद्यालयाच्या IQAC समितीने तपासलेल्या Academic Research Score चे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४. समिती सदस्यांचे मानधन, दैनिक भत्ता, भोजन तदनुषिक खर्च, बैठक भत्ता (Seating Allowance) आदिंचा विचार करता शिक्षकांनी द्यावयाच्या फि मध्ये मागील शिबिराप्रमाणे शिबिर नोंदणी खर्च एका स्टेजसाठी रु. ३०००/- (रुपये तीन हजार मात्र) व दोन स्टेजसाठी प्रस्ताव असेल तर रु. ५०००/- (रुपये पाच हजार मात्र) इतके शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे. सदरहू शुल्क आयोजक महाविद्यालयात (पी ओ नाहटा महाविद्यालय, भुसावळ) प्रस्तावासोबत रोखीने भरावे आणि शुल्क भरल्याची पावती प्रस्तावासोबत जोडावी, तसेच आयोजक महाविद्यालयाने शुल्क मिळाल्याबद्दलची पावतीही संबंधित शिक्षकांना द्यावी. सदरचा प्रस्ताव त्याच ठिकाणी जमा करावा.

५. महाविद्यालयाचे / संबंधित शिक्षकाने त्याची मूळ सेवापुस्तिका Academic Research Score तपासलेल्या तदनुषंगिक कागदपत्रांच्या मूळ प्रती शिबिराच्या दिवशी आणणे आवश्यक राहील.

६. प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम मुदतीनंतर शिबिर आयोजित करण्यात येणार असून. शिबिराच्या तारखा लवकरच कळविण्यात येतील.

तरी प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त बाबी विचारात घेऊन आपण आपल्या महाविद्यालयातील स्टेज १ व स्टेज २ पदोन्नतीसाठी पात्र शिक्षकांचे प्रस्ताव दि. १५ जून, २०२६ पर्यंत वर नमूद महाविद्यालयांत जमा करावेत.

कृपया सदरची बाब संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून देऊन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

सहायक कुलसचिव (अतिरिक्त कार्यभार)
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा. प्राचार्य, ताप्ती एज्युकेशन सोसायटी भुसावळ संचलित, भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओ. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

प्रत माहिती साठी :-

१) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव
२) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि,जळगांव
३) मा.उपकुलसचिव, मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगांव
४) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगांव
५) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि,जळगांव

staffapp\ext.let.26\PN.18